लोकमत

# मोफत तपासणीचा २५० रुग्णांना लाभ



मुंबई : फुफ्फुस आणि सांध्याच्या विकाराशी लढा देणाऱ्या रुग्णांसाठी लीलावती हॉस्पिटल्स व मेनाबेन हेल्पिंग हॅण्ड्स यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा २५० रुग्णांनी लाभ घेतला असून, तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. गरजू रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. या शिबिरांतर्गत अस्थमा आणि क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) ग्रस्त रुग्णांची स्पायरोमेट्री तपासणी करण्यात आली. तसेच बोन मिनरल डेन्सिटी (बीएमडी) चाचणी केली. प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि जुनाट आजारांचे वेळीच निदान व व्यवस्थापन करण्याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.